# दांडेकर पूल झोपडीधारकांना आज सदनिकांचे हस्तांतरण

पुणे, दि. ३१ (प्रतिनिधी) - 'नाईकनवरे डेव्हलपर्स' आता 'स्लम रिहॅबिलिटेशन' अर्थात झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात आपला पाया भक्कम करीत आहे. संस्थेने दांडेकर पूल परिसरात ७.४१ एकरमध्ये दोन झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेतले आहेत. यांतील 'परिवर्तन' या प्रकल्पातील १९२ सदनिका उद्या (दि. १) झोपडपट्टीधारकांना हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

याबरोबरच सात दुकानांचेही हस्तांतरण करण्यात येणार आहे. नगरविकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर यांच्या हस्ते सदनिका हस्तांतरण समारंभ पार पडणार असल्याची माहिती 'नाईकनवरे डेव्हलपर्स'चे संचालक हेमंत नाईकनवरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संस्थेचे संचालक रणजित नाईकनवरे यावेळी उपस्थित होते.